# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/12/2022 (शुक्रवार) सायंकाळ

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०.५ कि.मी अंतरावर वार्ड क्र. ५ सटवा माता मंदीर झोपडपटटी सावनेर येथे दिनांक २३/१२/२०२२ चे ०५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती शालु संतोष गोरले, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ५ सटवा माता मंदीर झोपडपटटी सावनेर ही आपल्या घरी झोपुन असतांना आरोपी नामे— नितीन उर्फ मोनु हरिप्रसाद उबनारे, वय ३८ वर्षे, रा. डब्लु. सी. एल. वाघोडा सावनेर हा घराचे छतावर चढुन फिर्यादीच्या घराचे दाराला लाथ मारून अनाधिकृतपणे आत प्रवेश करून फिर्यादीस ''तु मेरे साथ क्यु नही रहती अगर तु मेरे साथ नही रहेगी तो तुझे जान से मार दुंगा'' अशी धमकी दिली त्यावर फिर्यादीने ''मी तुझ्या सोबत राहु शकत नाही'' असे म्हटले असता यातील आरोपी याने ''अभी तेरा खेल ही कर देता हु'' असे म्हणुन फिर्यादीस जिवे मारण्याचा उद्देशाने आरोपी यांने त्यांचे सोबत आणलेला लोखंडी बत्त्याने फिर्यादीचे डोक्यावर वार करून फिर्यादीस जखमी करून जिवाने मारण्याचा प्रयत्न केला व शिवीगाळी करून धमकी देवुन निघुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ४५२, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर पो.स्टे. सावनेर मो. क्र. ७६६६९७९८६५ करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बेला :— अंतर्गत ०१ किमी. अंतरावर मौजा बेला टावुन येथे दिनांक २०/१२/२०२२ चे १४.३० वा. दरम्यान यातील **मृतक नामे— सौ. अश्विनी आकाश डोंगरे, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ५ बेला जि. नागपूर** हिने आपले राहते घरी कुठल्यातरी अज्ञात कारणावरून घराचे बेडरूममध्ये पाळण्याचे दोरीला ओढणीला बांधुन गळफास लावला. तिचा दिर विशाल डोंगरे याला दिसताच त्याने तिला खाली उतरवुन गाडी बोलावुन प्राथमिक उपचाराकरीताा पी. एस. सी. बेला येथे नेले असता पेशंटला पुढील उपचाराकामी मेडीकल कॉलेज, नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे पोलीस हवालदार ब. नं. २०७ संदीप रूडे पोस्टे बेला यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ६८६ अजय चौधरी पोस्टे. बेला मो.क्र ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर